# बोर्ड कृतिपत्रिका: जुलै 2024

**Time: 3 Hours** **Max. Marks: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.

(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ – गद्य [२०]

**कृती १. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (८)

परिणाम लिहा –

(१) माणसं अस्वस्थ, उदास होतात तेव्हा – (२)

(य) ..................

(र) ..................

(२) पुढील चौकटी पूर्ण करा - (२)

(य) खेळाचा आणि छंदाचा उद्देश्य – [ ]

(र) पोटापाण्यासाठी करतात तो – [ ]

शिकण्यातला आनंद हा तर आयुष्यभर न संपणारा असतो. शिकलेलं शिकवण्यातही आनंद असतोच. हा आनंद आपण किती घेतो? नाईलाजानं नव्हे, परीक्षा देण्यासाठी नव्हे की कुणावर उपकार म्हणून नव्हे, केवळ स्वत:ची हौस म्हणून काही शिकून पाहा. एखादी कला, एखादी भाषा, एखादा खेळ. माणसं स्वत:ची हौस, स्वत:चा छंद विसरू कसा शकतात, हे मला न उलगडलेलं कोडं आहे. खेळाचा आणि छंदाचा उद्देशच केवळ आनंद हा असतो. पोटापाण्यासाठी उद्योग आणि आनंदासाठी छंद इतकं हे साधं गणित आहे आणि छंद म्हणाल तर तो अगदी कुठलाही असू शकतो. वेगवेगळे दगड गोळा करण्याचं किंवा पक्षी निरीक्षणाचं... कसलं कसलं वेड घेतात लोक डोक्यात; पण तेच त्यांच्या आनंदाचं आणि उत्साहाचं रहस्य असतं. आनंद हवा असेल, तर थोडं वेडं व्हावंच लागतं. नेहमी 'शहाणंसुरतं' राहून जमत नाही.

शहाणंसुरतं राहायचं असेल, तर वाचनाचा छंद लागतोच. पुस्तकांची सोबत म्हणजे तर अक्षरआनंदाची सोबत. ही सोबत तुम्हाला कधीच दगा देत नाही. या आनंदासाठी टिच्चून पैसे मोजावे लागत नाहीत. तुमचा हा आनंद कुणीच हिरावून घेऊ शकत नाही. सपाटून वाचावं आणि झपाटून जावं. माणसं अस्वस्थ होतात, उदास होतात, तेव्हा परमेश्वराचा धावा करतात. काहीजण अशा वेळी आवडीचं पुस्तक वाचतात, त्यादृष्टीनं पुस्तकाला परमेश्वरच म्हणायला हवं..

(३) स्वमत अभिव्यक्ती – (४)

'आनंद हवा असेल, तर थोडं वेडं व्हावंच लागतं', – या विधानाची साधक-बाधक चर्चा तुमच्या शब्दांत करा.

**किंवा**

'छंदातून आनंद प्राप्ती होत असते', याबाबत तुमचे अनुभव व्यक्त करा.

**(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (८)

वैशिष्ट्ये लिहा -

(१) व्यंगचित्रांच्या भाषेची वैशिष्ट्ये – (२)

(य) ..................

(र) ..................

(२) आई-मुलाच्या नात्याची वैशिष्ट्ये (२)

(य) ..................

(र) ..................

अशी अनेक चित्रं काढता काढता एका क्षणी माझ्या लक्षात आलं, की व्यंगचित्रं ही नि:शब्द भाषा आहे. त्या रेषांना शब्द नाहीत; पण तरीही ती एक प्रभावी भाषा आहे. मला वाटतं तशी ती खरंच भाषेइतकी संवादी आहे का हे अजमावण्यासाठी म्हटलं, घेऊ अनुभव! माझे हे खेळ सुरू झाले. एखादी सुंदर काव्यात्म कल्पना व्यंगचित्रातून व्यक्त करता येते का? तर उत्तर आलं' येते.' मी हे स्वतः अनुभवलं. व्यंगचित्रातून एखादया माणसाबद्दलची भावना व्यक्त करता येते का? तर तीही येते. शब्दांतूनसद्धा ती व्यक्त होणार नाही इतकी छान करता येते. व्यंगचित्राच्या भाषेला जी मार्मिकता आहे ती शब्दाहून प्रभावी आहे. अशी जी काव्यात्म चित्रं मी रेखाटली त्यातलं एक 'आई' विषयी सारं काही सांगण्यासाठीच होतं. आईचं नातं हे सगळ्या जगातलं एकमेव खरं आणि सुंदर नातं आहे. बाकीची नाती ही जोडलेली असतात. माणसांमध्ये मला जर कुठे ईश्वराचा अंश दिसत असेल तर तो आईमध्ये दिसतो. हे नातं मला कसं दिसतं हे व्यक्त करण्यासाठी मी जे चित्रं काढलेलं होतं, त्यात उन्हाळ्यातला वैशाख वणवा आहे. त्यात एक सुकलेलं झाड पण आहे. एकही पान नसलेल्या त्या झाडाच्या फांदीवर एका पक्ष्यानं घरटं केलेलं आहे. त्या घरट्यात चोच उघडून आकाशाकडे बघणारी तीनचार पिल्लं आहेत आणि त्या पिल्लांची कणसदृश्य आई पार आकाशात गेलीय. दूरवर सापडलेला एक पावसाचा ढग ती चोचीनं घरट्याच्या दिशेनं ओढून आणतेय, आता आई हे नातं मी कितीही शब्द वापरले तरी या चित्रासारखं मला व्यक्त करता येणार नाही. हे व्यक्त झालं असेल तर हा मोठेपणा माझा नाही.

(३) स्वमत अभिव्यक्ती : (४)

'एखादे व्यंगचित्र हे प्रत्यक्ष भाषेपेक्षा संवादाचे प्रभावी माध्यम असू शकते', हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**किंवा**

आई कुटुंबाचा कणा असते', याबाबत तुमचे मत लिहा.

**(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(४)**

(१) कृती करा : (२)

फिरण्याच्या व्यायामाचे दोन परिणाम –

(य) ..................

(र) ..................

फिरण्याच्या व्यायामामुळे आपले स्नायू आपले होतात, खुलतात. आपल्याशी संवाद करायला लागतात. आपल्या शरीराशी त्यांचं तुटलेलं नातं पुन्हा जुळतं. शरीराचा सूर लागतो. चालताना पावलांची लय श्वासासोबत जोडायची. तीन पावलं श्वास घ्यायचा, चार पावलं सोडायचा. श्वास, पावलं, शरीर व मन सर्व एका लयीत येतात. चालण्याचं एक गाणंच होतं! सोबतचं बाहेर दिसणारं विश्वदेखील विलक्षण परिणाम करून जातं. उंच झाडं, दूरवरचे ढग, लांबचं क्षितिज यांमुळे नजरेचा विस्तार वाढतो, तिला विशालतेचं परिमाण मिळतं. सहसा आपल्या नजरेचा विस्तार ऑफिसच्या केबिनचं दार, लोकलच्या डब्याच्या भिंती किंवा बेडरूमचं छत यांनी मर्यादित होतो. इन-मिन पंधरा फुटांचं क्षितिज! हळूहळू मनही पंधरा फुटांनी मर्यादित होत असावं. फिरायला गेल्यावर अवघं जंगल, अवघं आकाश, अवघा सूर्य आपल्या डोळ्यांच्या कवेत येतो. डोळ्यांचं क्षितिज विस्तारतं. हळूहळू मनाच्या क्षितिजात हे सर्व विश्व मावायला लागतं - तेवढ्या क्षणांपुरतं का होईना !

(२) चौकटी पूर्ण करा : (२)

चालताना एका लयीत येणारे घटक

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

## विभाग २ – पद्य

[१६]

**कृती २. (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (८)

(१) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा :

(य) सर्वांमध्ये मिसळून माझे वेगळेपण जपतो.
काव्यओळ .................

(र) आयुष्याने माझीच का बरे फसगत केली.
काव्यओळ .................

(२) एका शब्दात उत्तरे लिहा. (२)

(य) कवीसवें राहणारी – ...................

(र) माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा – ...................

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा !

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे ;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा !

राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी ;
हे कशाचें दु:ख ज्याला लागला माझा लळा !

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा !

सांगती 'तात्पर्य ' माझें सारख्या खोट्या दिशा :
"चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !"

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

(३) अभिव्यक्ती : (४)

समाजात स्वत:चे वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न करावेच लागतात', सोदाहरण स्पष्ट करा.

**(आ) खालील ओळींचा अर्थ लिहा :** (४)

कणस भरूं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णी

(इ) **खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा :** (४)

**काव्यसौंदर्य :**

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी,

वरील ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

Target Publications

किंवा

**रसग्रहण :**

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं पाणी शेंदते,
बाई शेंदते.
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

वरील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा

[१०]

**कृती ३. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :** (४)

(अ) (१) एका वाक्यात उत्तरे लिहा :

(य) मराठीत सर्वाधिक वाचल्या जाणाऱ्या वाङ्मय प्रकाराचे नाव लिहा. (१)

(र) कथेचे मुख्य वैशिष्ट्य लिहा. (१)

मराठी कथा विलक्षण मनोरंजक आहे. तिची खुमारीच मोठी न्यारी आहे. मराठीत सर्वांत जास्त वाचला जाणारा साहित्यप्रकार म्हणजे 'कथा' होय. दिवाळी अंकांमध्ये कथेला मानाचे पान दिले जाते, ते तिच्या मनोरंजकता या वैशिष्ट्यामुळे. आबालवृद्ध कथा सांगण्याचा आणि ऐकण्याचा आनंद मनमुराद लुटतात तो तिच्या या मनोरंजकतेमुळेच. मनोरंजनाची कितीतरी अत्याधुनिक साधने - उदा., टी. व्ही. वगैरे खूप नंतर उदयास आली; पण पहिला मान कथेचाच. कथा सर्वांनाच हवीहवीशी वाटते याचे कारण तिच्या मनोरंजकतेत दडले आहे. मुले तर गोष्ट सांगण्यासाठी भंडावून सोडतात. मोठी माणसेही याला अपवाद नसतात. माणूस गोष्टीवेल्हाळ झाला तो तिच्या 'मनोरंजकता' या वैशिष्ट्यामुळेच.

मनोरंजकतेप्रमाणेच मनावर संस्कार करण्याचीही जबरदस्त ताकद कथेत असते. कथेच्या माध्यमातून 'मूल्यविचार' रुजवता येतात. कथा प्रेरणा, स्फूर्ती, बोध, ज्ञान देते. मानवता, सत्य, समता, न्याय, स्वातंत्र्य, बंधुभाव, औदार्य, धैर्य, श्रमनिष्ठा, संवेदनशीलता, दया, सहकार्य अशा कितीतरी मूल्यांचा संस्कार कथा करते. मानवी मूल्यांची कदर करणारी आदर्श व्यक्तिमत्त्वे कथावाङ्मयात जागोजागी आढळतात.

(२) कथेच्या माध्यमांतून वाचकांच्या मनावर केले जाणारे मूल्यसंस्कार लिहा. (२)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** (६)

(य) अनुची समाज समजून घेण्यामागची भूमिका स्पष्ट करा.

(र) बोर्डिंगमधील मुलांचे बापू गुरुजींबद्दलचे प्रेम तुमच्या शब्दांत लिहा.

(ल) 'अनु' या व्यक्तिरेखेबद्दल थोडक्यात लिहा.

(व) 'गढी' या कथेच्या शीर्षकाची समर्पकता थोडक्यात स्पष्ट करा.

## विभाग ४ – उपयोजित मराठी

[१४]

**कृती ४.(अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा :** (४)

(१) मुलाखतीचे विविध प्रकार थोडक्यात लिहा.

(२) माहितीपत्रकाची गरज विशद करा.

(३) अहवालाची आवश्यकता स्पष्ट करा.

(४) बातमीवर आधारित वृत्तलेखाचे स्वरूप लिहा.



Target Publications

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** (१०)

**खालील मुदृदयाच्या आधारे मुलाखत कशी घ्यावी, ते थोडक्यात लिहा.**

(१) मुलाखतीची सुरुवात .......... मुलाखतीचा मध्य .......... दिमाखदार ........ संवादमाला मुलाखतीचा समारोप ........... श्रोत्यांपर्यंत मुलाखत ........... पोहोचणे.

(२) खालील मुद्दयांचा परामर्ष घेऊन माहितीपत्रक सुंदर कसे बनवता येईल, ते स्पष्ट करा.
माहितीला प्राधान्य .......... माहितीची उपयुक्तता .......... माहितीचे वेगळेपण .......... आकर्षक मांडणी ......... भाषाशैली.

(३) खालील मुद्दयांच्या आधारे वृत्तलेख लिहिताना घ्यावयाची काळजी, याबाबत सविस्तर लिहा.
वाचकांची अभिरुची ............. तात्कालिकता ............. विषयाचे वेगळेपण ....... वाचकांचे लक्ष वेधणे ............. वृत्तलेखनाची शैली.

(४) खालील मुद्दयांच्या आधारे अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये लिहा.
वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता ............. अहवाल लेखनाची विश्वसनीयता ............. लेखनातील सोपेपणा शब्दमर्यादा ............. नि:पक्षपातीपणा.

## विभाग ५ – व्याकरण व लेखन

[२०]

**कृती ५. (अ) सूचनेनुसार कृती करा :** (१०)

(१) (य) किती अफाट पाऊस पडला काल !
वरील वाक्याचे योग्य विधानार्थी वाक्य ओळखून लिहा.
(१) काल काय कमी पाऊस पडला का? (२) काल कमी पाऊस पडला.
(३) काल खूप पाऊस पडला. (४) काल खूप पाऊस पडला नाही.

(र) सूचनेनुसार सोडवा. (१)
चैनीच्या वस्तू स्वस्त नसतात. (होकारार्थी वाक्य करा.)

(२) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
'खरेखोटे' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
(१) कर्मधारय समास (२) विभक्ती तत्पुरुष समास
(३) वैकल्पिक द्वंद्व समास (४) द्विगू समास

(र) 'कमलनयन' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. (१)

(३) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
कलाकाराने शिल्प घडवले.
या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा :
(१) कर्तरी प्रयोग (२) कर्मणी प्रयोग
(३) भावे प्रयोग (४) यांपैकी नाही.

(र) 'भावे प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा. (१)
(१) सैनिकाने शत्रूला सीमेवर रोखले. (२) गाय गोठ्यात परतली.
(३) पक्षी घरट्यात परतले. (४) रमेश पुस्तक वाचतो.

Target Publications

(४) (य) योग्य पर्याय निवडा : होई जरी संतत दुष्टसंग (१)
न पावती सज्जन सत्त्वभंग;
असोनिया सर्प सदाशरीरीं;
झाला नसे चंदन तो विषारी.
वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.
(१) अनन्वय (२) अतिशयोक्ती
(३) अर्थान्तरन्यास (४) अपन्हुती

(र) या दानाशी या दानाहुन (१)
अन्य नसे उपमान
या वाक्यातील उपमेय ओळखा.

(५) (य) 'मळभ दूर होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा: (१)
(१) आकाश लख्ख होणे.
(२) गैरसमज दूर होणे.
(३) मन मोकळं होणे.
(४) मनाला हुरहुर वाटणे.

(र) 'मळभ दूर होणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (१)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा.** (१०)

(१) पहाटेचे सौंदर्य
(२) माझे आवडते शिक्षक
(३) भ्रमणध्वनीचे (मोबाईलचे ) मनोगत
(४) सूर्य मावळला नाही तर .........
(५) युग आहे माहिती तंत्रज्ञानाचे!

Target Publications